**“भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (ए. आय. सी. टी. ई.) नवी दिल्ली, यांच्या अटल अकादमी पुरस्कृत राष्ट्रीय प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे आयोजन”**

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर येथे भारत सरकारच्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (ए. आय.सी.टी.ई.) प्रशिक्षण आणि शिक्षण (अटल) या प्रकल्पाअंतर्गत भारतातील फार्मसी व अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्यासाठी विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. “एक्स्प्लोरिंग फार्माकोकायनेन्याटिक विथ आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड कॉटम कॉम्प्युटिंग” या विषयावर आधारित कार्यक्रम सोमवार दिनांक 02 नोव्हेंबर ते शुक्रवार दिनांक 06 नोव्हेंबर 2020 पर्यंत आयोजन केलेले आहे.

भारतातील विविध 39 ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम चे राष्ट्रीय स्तरावर संयुक्त उद्घाटन मानव संसाधन विकास समितीचे माननीय अध्यक्ष व आय. सी. सी. आर. चे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते, ए आय सी टी ई चे चेअरमन, उपचेअरमन, संचालक आणि डॉ. मनिष गुप्ता (डायरेक्टर गुगल रिसर्च इंडिया) यांच्या उपस्थितीत दिनांक 2 नोव्हेंबर 2020 रोजी सकाळी 9 वाजून 30 मिनिटांनी होईल. सदर कार्यक्रमासाठी भारती विद्यापीठाचे डॉ. एच. एम. कदम ( मानद संचालक, भारती विद्यापीठ पुणे, सांगली विभागीय कार्यालय), भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे व डॉ. एम. एस. भाटिया उपप्राचार्य यांची उपस्थिती कार्यक्रमाची शोभा वाढवेल. सदर शिबिराचे थेट प्रक्षेपण https://www.youtube.com/c/MediaAICTE या संकेतस्थळावर सकाळी 9:30 मी. पासून सादर होईल

सदर प्रशिक्षण शिबिरामध्ये रोज 3 तांत्रिक प्रशिक्षण सत्रांचे यापमाणे एकूण 13 तांत्रिक प्रशिक्षण सत्रे व सहभागी होणाऱ्या लोकांचा तान तनाव कमी करण्यासाठी 1 संगीत उपचार सत्र आयोजित करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम पाच दिवस चालणार असून या कार्यक्रमासाठी देशभरातून सुमारे 200 शिक्षक व संशोधक सहभागी होणार आहेत. या शिबिरासाठी डॉ. प्रशांत मुरूमकर(सहाय्यक प्राध्यापक, फॅकल्टी ऑफ फार्मसी, डेपोटी डायरेक्टर, ऑफिस ऑफ ॲल्युमिनि अफेअर अँड सिनेट मेंबर, महाराजा सयाजीराव यूनिव्हर्सिटी ऑफ बरोदा, वडोदरा), डॉ. कुंदन इंगळे (एप्लीकेशन सायंटिस्ट इन व्ही लाइफ सायन्सेस), डॉ. भाऊसाहेब पाटील (सीनियर डायरेक्टर क्लिनिकल कॉलिटी मॅनेजमेंट,. ग्लोबल हेड अँड सीनियर डायरेक्टर- क्लीनिकल फ्लाईट मॉनिटरिंग कॉलिटी मॅनेजमेंट ( सी एस एम क्यू ए) ईक्विया, लंडन.), डॉ. पूजा जैन (सहाय्यक प्राध्यापक, डिपार्टमेंट ऑफ कम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूर, महाराष्ट्र.), डॉ. संतोष पाटील (सीनियर लीड इन्व्हेस्टीगेटर साईजीन लिमिटेड, बेंगलोर.), डॉ.सुबर्णा रॉय (सायंटिस्ट एफ/ डेप्युटी डायरेक्टर( सीनियर ग्रेड), आयसीएमआर- नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एपीडेमीओलॉजी, डिपार्टमेंट ऑफ हेल्थ रिसर्च, गव्हर्मेंट ऑफ इंडिया, अयापाकम,चेन्नई.), डॉ. अजय पिलाई (सायंटिस्ट डी, हेड, प्रोजेक्ट मॅनेजमेंट सेल,एन. सी. सी. एस., पुणे.), डॉ.गणेश व्हि.(सॉफ्टवेअर आर्किटेक एट नोवालीड फार्मा, पुणे.), डॉ. स्वामी मुखोपाध्ये (प्रिन्सिपल ॲप्लीकेशन सायंटिस्ट इन नोवालीड फार्मा, पुणे.), डॉ. अनिल देशपांडे (लीड इन्वेस्टीगेटर, डिस्कवरी केमिस्ट्री, सायजीन इंटरनॅशनल लिमिटेड, बेंगलोर, इंडिया.), डॉ. रघुवीर पिसूरलेनकर (सहयोगी प्राध्यापक, गोवा कॉलेज ऑफ फार्मसी, गोवा, इंडिया), श्री. सचिन जगताप (सहाय्यक प्राध्यापक, एमबीए डिपारमेंट, सायबर, प्रोप्रायटर ऑफ जीवन गाणे ग्रुप कोल्हापूर), डॉ. सुभाष अजमानी (डाटा सायन्स एक्सपर्ट अॅट जेनपॅक्ट अँड व्हिजिटिंग फॅकल्टी इन इंटरनॅशनल स्कूल ऑफ सायंटिफिक कॉम्प्युटिंग, युनिव्हर्सिटी ऑफ पुणे.), विनोद गायकवाड (सहयोगी प्राध्यापक, डिपार्टमेंट ऑफ फार्मासुटिक्स, पूना कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे.) तसेच डॉ. वंदना पत्रावळे (प्राध्यापक, फार्मासिटिक्स डिपार्टमेंट, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई.) यासारखे देशातील नामवंत संशोधक उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या कौशल्य विकास कार्यक्रमाचे डॉ. एम. एस. भाटिया हे मुख्य समन्वयक व प्रा. व्ही.टी. पवार सहसमन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. भारतातील विविध फार्मसी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे यांनी केले.